# THINK LABOR

**To keep up with everything skilling and employment**

Pratham

## एक गाव असरचं ......

तुम्ही कोण आहात?
कुठून आलात?
कसला सर्व्हे करताय
कशासाठी करताय?
कोणी सांगितलं तुम्हांला सर्व्हे करायला?

या आणि इतर प्रश्नाने गावात सुरुवात होते. मुलांचा शैक्षणिक स्तर आम्ही पाहतोय, लॉकडाऊन मुळे मुलं घरातच होती. ती शाळेत जाऊ शकली नाहीत, कॉलेजमध्ये जाऊ शकली नाहीत. या सर्व्हे मुळे आपल्याला लक्षात येईल की, मुलांचा नक्की स्तर काय आहे? मी मुंबईवरून आलो आहे. माझ्यासोबत जी स्टूडेंट आहे, ती नांदेड विद्यापीठांमधून आली आहे. ही माहिती दिल्यावर पालक सहकार्य करायला तयार होत. शिक्षणा संदर्भात सर्व्हे आहे म्हटल्यावर, बसा ...बोला! चटई टाकणे, खुर्ची देणे इत्यादी प्रकार होत असत. मग आम्हीं मुलांकडून माहिती हळूहळू घ्यायला सुरुवात करत असू. असर किट दाखवेपर्यंत आजूबाजूला पालक, आजी - आजोबा व लहान मुले यांचा घोळका जमा होई. आता ह्याला काय विचारणार आहेत? सर्वांची उत्सुकता फारच वाढे.



सुरुवातीला मुलं गांगरलेली वाटायची, घाबरलेली वाटायची. पण हळूहळू वातावरण निवळत जात असे. सुरुवातीला त्यांच्याशी गप्पा मारत-मारत घरातल्या कुटुंबांची माहिती विचारण्याचा प्रयत्न करत असू. मुलावर आलेलं दडपण कमी करण्याचा आमचा प्रयत्न असे.

घरात शिरण्या आधी पालकांनी ज्या पद्धतीचे प्रश्न उपस्थित केले होते, ते प्रश्न पुढे रहात नसत. चहा घेता का! नाश्ता करता का! काहींनी जेवणाची विचारणा केली. अचानकपणे घरातलं वातावरण बदलताना दिसे. मुलांकडून माहिती घेत असताना पालकच मध्ये-मध्ये उत्तर देण्याचे प्रयत्न करत. कधी तर घरातली छोटी भावंड पण पटापट उत्तर देताना दिसली. प्रत्येक सदस्याला वाटते की आपल्या मुलांनी उत्तर योग्य दिलीच पाहिजे. जसे जसे प्रश्न पुढे पुढे सरकत तसतसे प्रश्न अधीक अवघड होत जात. अशावेळी पालकांच्या चेहऱ्यावरचे प्रश्न वाढत होते. एखाद्या प्रश्नाचं उत्तर चुकले किंवा त्याला आले नाही तर, मध्येच पालक म्हणायचे, अरे एवढं साधं तुला उत्तर येत नाही. एवढा शिकलास तू. तुला काही कळत नाही का? अभ्यास येतो ना? का नुसता मोबाईलवर राहतोस. अशावेळी मुलाची अडचण आम्ही त्यांना समजवण्याचा प्रयत्न करीत असू. कुटुंबातील प्रत्येक माणसाला वाटे, आपला मुलगा चांगला शिकला पाहिजे ,बोला पाहिजे, त्यांनी बरोबर वाचले पाहिजे.

वय वर्ष १४ ते १८ वर्षातील मुलांची माहिती घेत असताना, एक बाब लक्षात येते ती म्हणजे, ही मुलं शिक्षणा सोबत घरातील किंवा शेतीची काही काम करत आहेत. पालकांची तशी अपेक्षा असू शकते.

शिक्षण घेणाऱ्या मुलांमध्ये मुलं पुढचं शिक्षण घेण्याची तयारी दाखवताना दिसतात. पण मुली मात्र बारावी पर्यंतच शिकू असे म्हणण्याचे प्रमाण जास्त आहे. पुढील करियर कशात करणार? किंवा कोणत्या कामात तुम्हाला जायला आवडेल? असे विचारले असता, पोलिस आणि सैन्य भरती यावर जास्त भर दिसला. याच्या शिवाय उच्च शिक्षणा संदर्भात कोणीही फारसं बोलताना दिसत नाही. विविध क्षेत्रात आपण आपलं करिअर करू शकतो, अशा स्वरूपाची माहिती देणारी मार्गदर्शन करणारी व्यवस्था आज गावात दिसत नाही. योग्य माहिती मुलांना मिळाली तर मुलं वेगवेगळ्या क्षेत्रात जातील असे वाटते. आर्थिक देवाण-घेवाण किंवा बँके विषयीच्या माहितीची कमतरता या मुलांमध्ये दिसते. गावात बँक नाही. एटीएम सुद्धा नाही. मुलांना अनुभव कसा मिळणार? काही लोकांनी एटीएम सुद्धा पाहिला नाही.

25 मुलांचा सर्वे केला, त्यात एकही मुलांच्या कुटुंबाकडे कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप नाही. कधीतरी शाळेत बघायला मिळाला आहे, किंवा हाताळता आला आहे. ई-मेल बनवण्याचा आणि पाठवण्याचा प्रश्नच येत नाही. काही मुलं अकरावी, बारावीची होती. ती तालुक्याला जातात शिक्षण घ्यायला आणि त्यासोबत कॉम्प्युटर क्लासेस करतात. त्या ठिकाणी मात्र त्यांना कॉम्प्युटर पाहायला आणि हाताळायला मिळतो.

या तरुण वर्गांमध्ये स्मार्टफोन चे आकर्षण मोठ्या प्रमाणावर आहे. प्रत्येक कुटुंबाकडे एक तरी स्मार्ट फोन होता. लॉक डाउनच्या काळात घेतलेला. आठवी, नववी आणि दहावी जाणाऱ्या मुलांकडे स्मार्टफोन नाही. ते त्यांच्या पालकांचा स्मार्ट फोन वापरतात. अकरावी बारावीच्या मुलांना स्मार्टफोन दिला जातो. पण गरिबातल्या गरीबाकडे आज स्मार्टफोन उपलब्ध झाला आहे. अनेकांनी आम्हाला सांगितले फोनचा वापर संवादासाठी,गाणी ऐकणे, फिल्म पहाणे, गेम खेळणे इत्यादीसाठी जास्त होतो.

या फोनचा अभ्यासासाठी किंवा पुढील करियर घडवण्यासाठी किंवा नविन काही शिकण्यासाठी होताना दिसत नाही. उदाहरणार्थ दीक्षा ॲप मधील माहिती डाऊनलोड करून पाहणे किंवा इंग्रजी संवादासाठी व्हिडिओ पाहणे किंवा कौशल्या बाबत माहिती मिळवणे, माहिती घेणे इत्यादी करताना दिसत नाहीत. एक निरीक्षण असे आहे की, या फोन मुळे टीव्ही बघण्याचे प्रमाण फारच कमी झालेलं आहे. काहींच्या घरात तर टी व्हीच नाही, पण मोबाईल आहे.

या संपूर्ण सर्व्हे मध्ये आम्ही पाहिलं की, मुलं शिकतायत. कॉलेजला जात आहेत. परंतु विविध प्रकारच्या तांत्रिक शिक्षणाबद्दल, व्यावसायिक शिक्षणाबद्दल फारशी माहिती असल्याचे लक्षात येत नाही. मुले ते करताना दिसत नाहीत. आयटी आय, पॉलिटेक्निक, शिवण क्लास इत्यादी कोर्स मध्ये शिकत आहेत, असं चित्र दिसत नाही. याबाबत मुलांमध्ये अवेअरनेस आणण्याची गरज आहे.



डिजिटल टास्क आणि टेस्टिंग चे काही प्रश्न मुलांना आम्ही विचारले. त्यात पहिला प्रश्न - अलार्म लावणं, दुसरा प्रश्न - देशाच्या राष्ट्रपतींचे नाव शोधणे. यु ट्युब वर एखादा व्हिडिओ शोधणे. एखाद्याला माहिती पाठवणे. ही मुलं मोबाईलवर सहजपणे करताना दिसली. त्यात प्रामुख्याने मुले टेक्स्ट मेसेज करण्या ऐवजी व्हॉइस मेसेज वर जाऊन सहजपणे करतात आणि महिती घेतात असे लक्षात आले.

वाचन, गणित आणि इंग्रजीमध्ये मुलांची बऱ्यापैकी प्रगती दिसते. परंतु यामध्ये इंग्रजीचा अनुवाद मराठीमध्ये सांगाताना अडचणी येत होत्या. गणितामध्ये वजाबाकी जमते, पण काहीना भागाकार जमत नाही. मुलं वाचताना मध्ये मध्ये अडखळतात. पण त्यांना दुसऱ्यांदा किंवा तिसऱ्यांदा वाचायला दिलं तर ते

व्यवस्थित वाचताना दिसली. O R S च्या पाकिटचे उदाहरण होतं. त्यातल्या सूचना वाचायच्या आणि त्याची उत्तर शोधायची. यामध्येही 50 टक्के मुलांनी उत्तर बरोबर दिली. 50 टक्के मुलांनी उत्तर चुकीची दिली. सूचना नीट न वाचल्यामुळे मुलांना अडचणी येत होत्या,लक्षपूर्वक  वाचणे. सराव करून घेतला तर त्याची उत्तरे योग्य येतात.

बजेट करणे, एखाद्या वस्तूवरची सूट कशी काढवी, वार्षिक व्याज कसे काढणार? असे प्रश्न विचारले असता, बऱ्याच मुलांना जमलं नाही.  यात मुलं कच्ची दिसतात. अनेक वेळा मुलं मनामध्ये कॅल्क्युलेशन करत बसतात. त्यांना आम्ही कागदावर लिहा आणि प्रयत्न करा आणि मग उत्तर द्या असे सांगावे लागेल. अशाप्रकारे एका विद्यार्थ्यांची माहिती घेतली की लगेच आम्ही दुसऱ्या घराकडे वळायचो.

नांदेड शहरापासून 80-100 किलोमीटरवर वसलेले एका गावाची निवड आमच्यासाठी करण्यात आली होती. गावाची लोकसंख्या 2410 एकूण घर 415 गाव दोन भागात विभागलेलं गाव होतं. गाव सधन होतं ,मराठा समाजाचे प्राबल्य असलेले हे गाव, शेतीप्रधान गावातील सर्व अंतर्गत  रोड सिमेंटचे होते. कच्या  घरांचे प्रमाण कमी होते.गावात जिल्हा परिषद शाळा सातवी पर्यंतची होती .ग्रामपंचायत कार्यालय आणि राशन दुकान होतें तसेच लाईट सुद्धा गावामध्ये होती.

 या सर्व्हे साठी पहिली जबाबदारी होती म्हणजे सरपंचाची भेट. त्यांचे सहकार्य घेऊन नकाशा तयार करणे आणि सर्व्हे ला सुरुवात करणे. सरपंच उपसरपंच भेटणं महत्त्वाचं. आम्ही भेटण्याचा खूप प्रयत्न केला. पण सरपंच भेट होऊ शकली नाही. ते एका प्रचारांमध्ये सहभागी झाले, पण नंतर समजले ज्याच्याशी आम्ही सरपंच म्हणून बोललो, ते सरपंच नव्हते. त्यांची आई सरपंच होती. सरपंच म्हणून सरपंच बाईंचा मुलगाच काम पाहत आसे . गावात सरपंच आणि सदस्य कोणी मिळणार नाही हे लक्षात आल्यावर मग आम्ही गावातील अंगणवाडी सेविकेची मदत घ्यायचे ठरवले .रेणुका बेळकर यांची मदत घेतली. असर महितचे पत्र दिले त्याना माहिती समजून सांगितली. त्यांनी सर्व प्रकारची मदत करायच ठरवल मग आम्ही गावात असर ला सुरूवात केली.

**Author:** Praful Shinde, Pratham